**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सार्वजनिक तसेच खाजगी जमीनींवरील गृह प्रकल्पांसाठी विकसनक्षम विभागात २.५ च.क्षे.निर्देशांक व "**शेती तथा ना विकास**" विभागात १ च.क्षे.निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१७/अनौसं-१२१/प्र.क्र.७७/१८/नवि-१३**
**दिनांक :२६ फेब्रुवारी, २०१८.**

सन-२०२२ पर्यंत देशातील प्रत्येकाला हक्काचे घर उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारने जुन-२०१५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे ही योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेअंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वांवरील प्रकल्पांसाठी केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या प्रतिकृतिंची (Model) राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून याबाबतची कार्यपध्दती गृहनिर्माण विभागाने शासन निर्णय क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना, दि.११/०१/२०१८ अन्वये निश्चित केलेली आहे. याअंतर्गत सार्वजनिक व खाजगी जमीनींवरील गृहप्रकल्पांसाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत EWS/LIG ची घरकुले असलेल्या योजनांसाठी विकसनक्षम विभागात २.५ इतका च.क्षे.निर्देशांक तसेच शेती तथा नाविकास विभागात १ इतका च.क्षे.निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर तरतूद राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेसाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३७ (१कक) अन्वयेची नोटीस क्र.टिपीएस-१८१७/अनौसं-१२१/प्र.क्र.७७/१८/नवि-१३, दि.२६/०२/२०१८ नुसार प्रसिध्द केलेली आहे. पंतप्रधान आवास योजनेतील उद्दीष्ट विचारात घेता सदरचा विनियम तातडीने लागू करणेसाठी शासन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१५४ अन्वये राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना / विशेष नियोजन प्राधिकरणांना पुढीलप्रमाणे निदेश देत आहेत.

*"निदेश*

*राज्यातील सार्वजनिक व खाजगी जमीनींवरील गृहप्रकल्पांसाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत केवळ EWS/LIG च्या घरकुलांचे बांधकाम असलेल्या योजनांसाठी विकसनक्षम विभागात २.५ तसेच शेती तथा नाविकास विभागात १ इतका च.क्षे.निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३७ (१कक) अन्वयेची नोटीस क्र.टिपीएस-१८१७/अनौसं-१२१/प्र.क्र.७७/१८/नवि-१३, दि.२६/०२/२०१८ नुसार प्रसिध्द केलेली आहे. सदरची तरतूद तातडीने लागू करण्यात येत आहे".*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

URBAN DEVELOPMENT DEPTT.

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत ही विनंती.

२) सह संचालक, नगर रचना, पुणे / कोकण / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक.

३) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) महानगर आयुक्त, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद.

५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

९) चेअरमन, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

१०) उप संचालक, नगर रचना तथा उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) आयुक्त, सर्व महानगरपालिका (विभागीय कार्यालयामार्फत).

१२) नगर रचना विभाग, सर्व शाखा कार्यालय (विभागीय कार्यालयामार्फत).

१३) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती (शाखा कार्यालयामार्फत).

१४) अवर सचिव, नवि-११, नवि-३०/ कक्ष अधिकारी,नवि-९, नवि-१२ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची सूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१७) निवड नस्ती (कार्यासन-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT.

D:\Pune Desk\Policy Matters\Nidesh.docx